# ७) साहसवज्जा

'वज्जालग्गं' हा प्राकृतातील एक उत्कृष्ट नीति-सुभाषितसंग्रह आहे. यातील रचना विषयवार असून प्रत्येक विषयावरील गाथासमूहाला 'वज्जा' असे नाव दिले आहे. 'वज्जा' म्हणजे पद्धती किंवा समूह. वज्जालग्गं या ग्रंथाचा कर्ता जयवल्लभ हे श्वेतांबर जैन मुनी असून त्यांचा काळ १३वे शतक मानला गेला आहे. यात एकूण ९५ वज्जा असून सुमारे ८०० गाथांचे संकलन केलेले आहे. श्लेषात्मक शब्दरचना हे वज्जालग्गंचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. साहसाचे महत्त्व सांगून साहसाशिवाय यशप्राप्ती होत नाही याविषयी चर्चा या पाठात आलेली आहे.

साहसमवलंबंतो, पावइ हियइच्छिअं ण संदेहो।
जेणुत्तमंगमेत्तेण, राहुणा कवलिओ चंदो।।१।।

तं किं पि साहसं, साहसेण साहंति साहससहावा।
जं भाविऊण दिव्वो, परंमुहो धुणइ णियसीसं।।२।।

थरथरइ धरा खुब्भंति, साअरा होइ विम्हलो दइवो।
असम-ववसायसाहस,-संलद्ध-जसाण धीराणं।।३।।

अगणिय-समविसमाणं, साहसतुंगे समारुहंताणं।
रक्खइ धीराण मणं, आसण्ण-भयाउलो दइवो।।४।।

तं किं पि कम्मरयणं, धीरा ववसंति साहसवसेणं।
जं बंभ-हरि-हराण वि, लग्गइ चित्ते चमक्कारो।।५।।

धीरेण समं समसीसियाइ, रे दिव्व आरुहंतस्स।
होहिइ किं पि कलंकं, धुव्वंतं जं ण फिट्टिहिइ।।६।।

जह जह ण समप्पइ, विहिवसेण विहडंत-कज्जपरिणामो।
तह तह धीराण मणे, वड्ढइ बिउणो समुच्छाहो।।७।।

फलसंपत्तीइ समोणयाइ, तुंगाइ फलविपत्तीए।
हिअआइ सुपुरिसाणं, महातरूणं व सिहराइं।।८।।

हियए जाओ तत्थेव, वड्ढिओ णेय पयडिओ लोए।
ववसायपायवो, सुपुरिसाण लक्खिज्जइ फलेहिं।।९।।

ववसायफलं विहवो, विहवस्स अ विहलजणसमुद्धरणं।
विहलुद्धरणेण जसो, जसेण भण किं ण पज्जत्तं।।१०।।

आढत्ता सप्पुरिसेहिं, तुंगववसायदिण्णहियएहिं।
कज्जारंभा होहिंति, णिप्फला कह चिरं कालं।।११।।

ण महुमहणस्स वच्छे, मज्झे कमलाण णेय खीरहरे।
ववसायसायरे, सुपुरिसाण लच्छी फुडं वसइ।।१२।।

तद्दियहारंभ-वियावडाण, मित्तेक्क-कज्जरसियाणं।
रविरहतुरयाण व, सुपुरिसाण ण हु हिअअ-वीसामो।।१३।।

## सद्दत्था

**साहसं** – धाडसी कृत्य
**हियइच्छिअं** – मनापासून हवे ते
**उत्तमंगेण**– (फक्त) मस्तकाने
**राहुणा** – राहू या ग्रहाने
**कवलिओ** – घास घेतला
**साहंति** – साधतात
**भाविऊण** – विचार करून
**दिव्वो** – दैव, नशीब
**धुणइ** – हलवतो
**थरथरइ** – थरथरतो
**धरा** – पृथ्वी
**खुब्भंति** – (समुद्र) खवळतात
**विम्हल** – विह्वल, व्याकुळ होईल
**दइव** – दैव
**असमववसायसाहससंलद्धजसाण** – उत्तम प्रयत्न (आणि) धाडसाने यश मिळवले आहे अशा लोकांचे
**धीराणं/धीराण** – धैर्यवान लोकांचे
**अगणिय** – महत्त्व न देता
**साहसतुंगे** – साहसरूपी शिखरावर
**समारुहंताणं**– आरूढ होत असणाऱ्यांना
**आसण्णभयाउलो** – जवळ आलेल्या भयामुळे व्याकुळ झालेला
**कम्मरयणं** – कर्मरूपी रत्नाला
**बंभहरिहराणं** – ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे
**समसीसियाइ** – समान पातळीवर
**आरुहंतस्स** – आरूढ होणाऱ्याचे
**धुव्वंतं** – धुतला जात असताना
**फिट्टिहिइ** – नष्ट होईल
**विहिवसेण** – नशीबामुळे
**विहडंतकज्जपरिणामो** – कर्माचा नष्ट होणारा परिणाम
**बिउणो** – द्विगुण, दुप्पट
**समुच्छाहो** – उत्साह
**समोणयाइ** – झुकलेले, वाकलेले
**सिहराइं** – शिखरे, इथे झाडाचे शेंडे
**वड्डिओ** – वाढला
**पयडिओ** – प्रकट केला, उघड केला
**ववसायपायवो**– उद्योगरूपी वृक्ष
**लक्खिज्जइ**– लक्षात येतो
**विहलजणसमुद्धरणं** – व्याकुळ झालेल्या लोकांचा उद्धार करण्यासाठी
**पज्जंतं** – पर्याप्त, पुरेसे
**आढत्ता** – सुरुवात केली
**वच्छे** – वक्षस्थळावर, छातीवर
**खीरहरे** – क्षीरसागरामध्ये
**तद्दियह** – त्याच दिवशी
**वियावडाण** – व्यापृत, व्यस्त असलेल्यांसाठी
**मित्तेक्ककज्जरसियाणं** – मित्रांच्या कामामध्ये रममाण होणाऱ्यांसाठी
**हिअअवीसामो** – हृदयाला (मनाला) विश्रांती

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) साहसमवलंबंतो ..... चंदो।।
२) थरथरइ धरा ..... धीराणं।।
३) तं किं पि ..... चमक्कारो।।
४) जह जह ण समप्पइ ..... समुच्छाहो।।
५) ण महुमहणस्स ..... फुडं वसइ।।

**२) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) राहूने चंद्राला गिळले त्याचे वर्णन करा.
२) धैर्यवान माणसाचा उत्साह वाढवणाऱ्या गोष्टी सांगा.
३) सत्पुरुषाच्या हृदयाची तुलना स्पष्ट करा.
४) सत्पुरुष व घोड्यामधील साम्य सांगा.

**३) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) सत्पुरुष व उद्योगरूपी वृक्ष हा दृष्टांत स्पष्ट करा.

२) 'सत्पुरुषाचे कार्य फार काळ निष्फळ राहू शकत नाही' हे स्पष्ट करा.

३) लक्ष्मी कायमस्वरूपी राहण्याचे ठिकाण व कारण सांगा.

४) 'अंगात साहस असेल तर कोणतेही काम अवघड नसते', या दृष्टांताची चर्चा करा.

**४) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**


१) रक्खइ धीराण मणं आसण्णभयाउलो दइवो।

२) जं बंभहरिहराण वि लग्गइ चित्ते चमक्कारो।

३) जं भाविऊण दिव्वो परंमुहो धुणइ णियसीसं।

४) हिअआइ सुपुरिसाणं महातरूणं व सिहराइं।

**५) मराठी समानार्थी शब्द भरून रेखाजाल पूर्ण करा.**




**६) खालील शब्दामधील उपसर्ग, धातू आणि प्रत्यय वेगळे करून लिहा.**

| शब्द | उपसर्ग | धातू | प्रत्यय |
|---|---|---|---|
| सुपुरिसाणं | | | |
| समोणयाइ | | | |
| समुच्छाहो | | | |
| आरुहंतं | | | |
| णिप्फला | | | |

**७) पाठातील योग्य शब्द निवडून गाथेतील रिकाम्या जागा भरा.**

१) फलसंपत्तीइ ..... तुंगाइ फलविपत्तीए।

२) ववसायपायवो सुपुरिसाणं लक्खिज्जइ .....।

३) ण ..... वच्छे मज्झे कमलाण णेय खीरहरे।

**८) समास ओळखा व सोडवा.**

१) हियइच्छिअं

२) साहससहावा

३) बंभहरिहराण

४) आसण्णभयाउलो

५) कज्जपरिणामो

६) फलसंपत्ती

७) सुपुरिसाण

८) ववसायपायवो

**९) रूपे द्या.**

१) वच्छ – सप्तमी बहुवचन –

२) सुपुरिस – तृतीया बहुवचन –

३) वड्ढ – कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषण, स्त्रीलिंगी द्वितीया बहुवचन –

४) आ+रभ – कर्म भू.धा.वि. नपुंसकलिंगी पंचमी बहुवचन –

५) महातरु – प्रथमा बहुवचन –

**१०) रूपे ओळखा.**

| | |
|---|---|
| १) सिहराइ | ७) वसइ |
| २) विहवो | ८) होहिंति |
| ३) जाओ | ९) धीराणं |
| ४) चित्ते | १०) फिट्टिहिइ |
| ५) राहुणा | ११) भाविऊण |
| ६) साहसं | १२) संदेहो |